

भगवान महावीरांचे अवघे जीवनच आपणा सर्वांसाठी प्रेरणादायक

सविस्तर वृत्त पान २ वर

www.attalmat.com

# अट्टलमत

RNI.No. MAHMAR/2007/21199 Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23

■ वर्ष -19, अंक-30 ■ छत्रपती संभाजीनगर, दि. सोमवार, 30 मार्च 2026 ■ किंमत 2 रूपये, पाने -4

## भ्रष्ट अधिकारी गेंड्याच्या कातडीचे!

छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)

दस्त नोंदणी कार्यालयाचा कारभार सध्या सर्वत्र गाजत आहे. एक अधिकारी झाला की, दुसरा अधिकारी तयारच असतो. भ्रष्टाचार करण्यास. सध्या वर्ग २ च्या जमिनी वर्ग १ मध्ये बोगस पद्धतीने दस्त नोंदणी प्रकरण छत्रपती संभाजीनगरात गाजत आहे. यात सर्वच अधिकारी आपले हात धुवुन घेत असल्याचे गोपनीय सूत्रांकडून समजते.

अधिकारी जोमात अन् सर्व सामान्य नागरिक कोमात अशी परिस्थिती सध्या दिसत आहे. हा प्रकार सर्व शासकीय विभागांमध्ये चालू आहे. भ्रष्ट अधिकाऱ्याला फक्त पैसाच दिसत असतो. त्याच्याकडे कोण पाहत आहे आणि कोण नाही याचेही भान त्याला राहात नाही. तो फक्त खोऱ्याने पैसा ओढण्यात गुंग असतो. अशा भ्रष्ट अधिकाऱ्यांना त्यांचेच वरिष्ठ खतपाणी घालत असतात.




जिल्ह्यात कुठेही दस्त नोंदणी होत असल्याने भ्रष्ट अधिकाऱ्यांना ते सोयीचे झाले आहे. जे कुणी करत नाही ते आम्ही करतो. या धर्तीवर शासनाचा महसूल बुड्वून स्वत:चे व एजंटाचे घर भरत असल्याचे दिसून येत आहे. एजंटगिरी बंद होवू शकत नाही. जोपर्यंत त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचा हात हात आहे. म्हणूनच तर त्यांच्या हातात तीन-चार सोन्याच्या अंगठ्या महागड्या गाड्या असतात.

सर्व सामान्य माणूस भरडला जात आहे. परंतु याचे त्यांना काही देणे घेणे नसते. सर्व सामान्य नागरिकांनी त्यांच्या कितीही तक्रारी केल्या तरी त्यांना काही फरक पडत नाही. याच्याच मुळे नागरिक म्हणतात की, हे भ्रष्ट अधिकारी गें ड्याच्या कातडीचे आहेत की काय त्यांना काहीच फरक पडत नाही. त्यातच बोगस दस्त नोंदणी केल्याचा संशय असल्याने सहा. दुय्यम अधिकारी सय्यद रसूल यांची गांगुर्डे साहेबांनी चौकशी लावली आहे. परंतु ते अशा आवेशात फिरतात की, माझे काहीच होणार नाही? या अशा चौकशीने मला काही फरक देखील पडत नाही अशा तोऱ्यात ते वावरत आहे. या कारणामुळेच नागरिक देखील म्हणतात भ्रष्ट अधिकारी हे गेंड्याच्या कातडीचे असतात म्हणून.. वरिष्ठ अधिकाऱ्याचा हात असल्याशिवाय कोणताही दस्त नोंदणी अधिकारी बोगस काम करण्याचे धाडस करू शकत नाही. ही दिसणारी गोष्ट आहे. त्यामुळे चौकशी निष्पक्ष तरी कशी होणार? यातही तक्रारदारांना शंका आहे. सय्यद रसूल याची चौकशी होवून सर्व सत्य जनतेसमोर यावे, अशी अपेक्षा अट्टल मत अधिकाऱ्यांकडे व्यक्त केली आहे.

## लॉकडाऊनची अफवा पसरविणाऱ्यांवर कडक कारवाई करणार- मुख्यमंत्री

छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)

महाराष्ट्रात लॉकडाऊन लागण्याच्या चर्चा आणि इंधन टंचाईच्या अफवांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कडक शब्दांत प्रतिक्रिया दिली आहे. महाराष्ट्रात लॉकडाऊन लागण्याच्या चर्चा आणि इंधन टंचाईच्या अफवांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कडक शब्दांत प्रतिक्रिया दिली आहे. मुख्यमंत्र्यांनी सांगितलं की, राज्यात लॉकडाऊन लावण्याचा कोणताही विचार नाही आणि जनतेने अशा दिशाभूल करणाऱ्या अफवांवर विश्वास ठेवू नये.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, काही लोक जाणीवपूर्वक समाजात भीती आणि संभ्रम निर्माण करण्यासाठी लॉकडाऊन, पेट्रोल-डिझेलची टंचाई किंवा गॅस सिलिंडर संपत असल्याच्या अफवा पसरवत आहेत. मात्र हे दावे पूर्णपणे चुकीचे आहेत. अशा अफवा पसरवणे हे केवळ बेजबाबदारपणाचे नसून देशद्रोहासारखे आहे, असे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले. अफवा पसरवणाऱ्यांची ओळख पटवून त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश त्यांनी दिले आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांसोबत घेतलेल्या बैठकीचा उल्लेख करत फडणवीस म्हणाले की, जागतिक संकटाच्या काळातही भारताने इंधन पुरवठा सुरळीत ठेवला आहे. वाढत्या किमतींचा भार केंद्र सरकारने स्वतः सोसला असून जनतेवर तो टाकला नाही. राज्यात एलपीजी आणि पेट्रोल-डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध आहे.

## ....आता सत्कार बंद करा आम्हाला कामे करू द्या - जि.प. अध्यक्ष अविनाश गलांडे



"पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर विश्वास ठेवून मुख्यमंत्री देवा भाऊ यांच्यावर विश्वास ठेवून जनतेने आम्हाला भरघोस मतांनी निवडून दिले आहे. त्यांच्या उपकाराची परतफेड मी माझ्या कामातून दाखवून देईल. माझ्या जी जबाबदारी पक्षश्रेष्ठींनी दिली आहे. ती मी पूर्णपणे यशस्वीरित्या पार पाडेल.

**-अविनाश गलांडे**, जि.प.अध्यक्ष

दिनेश परदेशी
(अट्टल मत - विशेष प्रतिनिधी)

जेव्हापासून जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्षांची निवड झाली तेव्हापासून जिल्ह्याभरातील कार्यकर्ते, नेते मंडळी, पदाधिकारी, अधिकारी कर्मचाऱ्यांची त्यातल्या त्यात समर्थक यांची अध्यक्ष व उपाध्यक्षांना भेटण्यासाठी व त्यांच्या बरोबर फोटो काढण्यासाठी रिघ जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर येथे दिसून येत आहे. असेच सत्कार स्वीकारताना जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे म्हणाले की, अरे बाबांनो सत्कार आता बंद करा आम्हाला नागरिकांचे कामे ही करू द्या. हे वाक्य ऐकून सत्कारासाठी आलेले समर्थक थोडे चापपले. परंतु काही क्षणातच सत्कार सुरू झाले. परंतु एक मात्र नक्की आहे.

अध्यक्षांना देखील वाटते की, आता फार झाले सत्कार... कामावर लक्ष केंद्रीत करून नागरिकांना त्याचा कसा फायदा करून देता येईल यावर लक्ष केंद्रीत झाले हे महत्त्वाचे. पत्रकारांशी बोलताना त्यांनी सांगितले. की मी माझ्या परीने १०० टक्के काम करेल आणि कुणालाही नाव न ठेवण्यासारखे काम करून दाखवेल. सध्या तरी त्यांच्या कामाने कर्मचारी, अधिकारी, नागरिक समाधानी दिसत आहे. असेच कार्य त्यांनी पुढे चालू ठेवावे अशी अपेक्षा आहे.

खासगी संस्थांच्या शिक्षकांच्या पेन्शनच्या प्रश्नासाठी भेट घेण्यासाठी आलेल्या शिक्षकांचे म्हणणे ऐकून घेत असताना उपाध्यक्ष जितेंद्र जैस्वाल हे देखील अध्यक्षांच्या दालनात आले. अध्यक्षांच्या बाजूला असलेल्या साध्या खुर्चीवर ते बसले. असल्याकारणाने अध्यक्षांनी शिपायाला सांगितले अरे बाबांनो उपाध्यक्षांना खुर्ची दुसरी द्या.... नाही तर अधिकाऱ्याची खुर्ची उचलून आणा. यावर दालनात एकच हशा पिकला.... उपाध्यक्ष मात्र त्याच खुर्चीवर बसून नागरिकांच्या समजून घेत होते.

### जोडी नं. वन




अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची जोडी सध्या वेगाने कामे करतील. अशी अपेक्षा नागरिकांना आहे. दोघेही कामात अग्रेसर असून दोघेही संगणमताने नागरिकांची प्रश्न सोडवत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे त्यांना जनता जोडी नं. १ म्हणत आहेत. सदस्यांशी असलेली जवळीक यांच्या कामी येणार तसेच त्यांचा मनमिळावू स्वभाव असल्याने सर्व शक्य होईल, असे काही सदस्यांनी सांगितले.

## ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमात छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त कार्यालयाची दमदार कामगिरी; राज्यात द्वितीय क्रमांक



छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)

महाराष्ट्र शासनाच्या '१५० दिवसांचा ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रम' अंतर्गत झालेल्या राज्यस्तरीय मूल्यमापनात छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त कार्यालयाने उल्लेखनीय कामगिरी करत राज्यात द्वितीय क्रमांक पटकावला आहे. डिजिटल रूपांतरणाच्या दिशेने ठोस पावले उचलत विभागाने राज्यात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

आज मुंबई येथील सह्याद्री सभागृहात पार पडलेल्या सम रंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांना प्रशस्तीपत्र प्रदान करून गौरविण्यात आले. राज्य शासनाच्या या महत्त्वाकांक्षी उपक्रमांतर्गत जिल्हा, विभाग आणि राज्यस्तरावरील शासकीय कार्यालयांच्या कामकाजाचे सात महत्त्वपूर्ण निकषांवर सखोल परीक्षण करण्यात आले. संकेतस्थळ व्यवस्थापन, 'आपले सरकार' सेवा, ई-ऑफिस प्रणाली, कार्यालयीन डॅशबोर्ड, व्हॉट्सअॅप चॅटबॉट, कृत्रिम बुद्धिमत्ता , ब्लॉकचेन तंत्रज्ञान तसेच भौगोलिक माहिती प्रणाली यांसारख्या आधुनिक साधनांचा प्रभावी वापर करून छत्रपती संभाजीनगर विभागाने प्रशासन अधिक स्मार्ट, पारदर्शक आणि गतिमान बनवले आहे.

ही मूल्यांकन प्रक्रिया दोन टप्प्यांत पार पडली असून अंतिम मूल्यमापन भारतीय गुणवत्ता परिषद यांच्याकडून करण्यात आले. या स्पर्धात्मक प्रक्रियेत राज्यातील सर्व विभागीय आयुक्त कार्यालयांमधून द्वितीय क्रमांक मिळवणे ही मोठी आणि अभिमानास्पद कामगिरी मानली जात आहे. विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व, नियोजनबद्ध कार्यपद्धती आणि अधिकारी-कर्मचाऱ्यांचे समन्वित प्रयत्न निर्णायक ठरले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली ई-गव्हर्नन्स उपक्रमांची काटेकोर अंमलबजावणी करण्यात आली. विभागनिहाय सातत्यपूर्ण आढावा, ई-ऑफिसचा प्रभावी वापर आणि नागरिक-केंद्रित निर्णय प्रक्रियेवर भर दिल्याने प्रशासन अधिक सक्षम आणि परिणामकारक झाले आहे. ई-गव्हर्नन्सच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे शासकीय सेवा वितरणात पारदर्शकता, वेग आणि सुलभता वाढली आहे. विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर म्हणाले, १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स कार्यक्रमामुळे शासकीय कामकाज अधिक पारदर्शक, गतिमान आणि तंत्रज्ञानाधारित झाले आहे. ही कामगिरी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सामूहिक प्रयत्नांचे फलित असून, भविष्यातही प्रशासन अधिक लोकाभिमुख करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर सातत्याने केला जाईल. तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापरातून नागरिकांना अधिक जलद, पारदर्शक व सुलभ सेवा देण्यावर आम्ही भर दिला. या यशाम गे सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांचे समर्पण व टीमवर्क आहे.

# जमीन मोजणी होणार आता सुपरफास्ट, प्रत्येक जिल्ह्यात खाजगी भूमापकांची नियुक्ती

मुंबई : जमीन मोजणी प्रकरणांचा निपटारा अचूक, जलद, गुणवत्तापूर्ण व पारदर्शी पद्धतीने व्हावा यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात प्रशिक्षित परवानाधारक भूमापक आणि भूमापन एजन्सी नियुक्ती करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत झालेल्या बैठकीनंतर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला.

याबद्दलची कार्यपद्धती निश्चित करून शासनाने आदेश जारी केला आहे. मोजणी प्रकरणांचे निश्चित वेळापत्रक ठरवून त्यानुसारच प्रत्यक्ष जमिनीची मोजणी व हद्द कायम करावी लागेल. वेळापत्रक निश्चित करूनच भूमी अभिलेख विभागाचे उपअधीक्षक संबंधितासाठी नोटीस काढतील. कामाशी संबंधित कागदपत्रे नसतील तर जबाब पंचनामे करून अहवाल द्यावा लागेल. या कामात भ्रष्टाचार अथवा गुन्हेगारी कारण समोर आले तर, परवाना रद्द करण्यात येणार आहे.

भूमी अभिलेख विभागामार्फत मोजणीचे काम केले जाते. तथापि, मोजणीसाठी वाढते अर्ज व मर्यादित शासकीय मनुष्यबळामुळे जमीन मोजणीची प्रकरणे प्रलंबित राहू नयेत याकरिता जिल्हास्तरावर परवानाधारक भूमापकांची नियुक्ती तांत्रिकदृष्ट्या पात्र असणाऱ्या एजन्सीकडून करण्यात येत आहे.

कामात अचूकता राहावी यासाठी या भूमापकांना 'ई-मोजणी २.०' या आधुनिक सॉफ्टवेअरचा वापर करावा लागणार असून, प्रत्येक भूमापकास दरमहा किमान वीस मोजणी प्रकरणे निकाली काढणे बंधनकारक करण्यात आले आहे. मोजणीनंतरचा नकाशा आणि कागदपत्रे ऑनलाईन अपलोड केल्यानंतर उपअधीक्षक भूमी अभिलेख यांच्याकडून अंतिम मंजुरी दिली जाणार आहे. यामुळे रखडणाऱ्या मोजणी प्रक्रियेत पारदर्शकता येईल आणि कामांना वेग मिळेल.

**जिल्हाधिकाऱ्यांची समिती :** योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. यामध्ये एन.आय.सी.चे तांत्रिक सल्लागार, आय.टी.आय.चे प्राचार्य आणि जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख यांचा समावेश आहे. खाजगी भूमापक म्हणून काम करण्यासाठी आय.टी.आय. (सर्व्हेइंग), सिव्हिल इंजिनिअरिंग डिप्लोमा किंवा पदवी, आणि जिओइन्फॉर्मेटिक्समधील पदवीधारक पात्र असतील. तसेच १० वर्षे सेवा केलेले निवृत्त भूमापन कर्मचारीही ६५ वर्षांपर्यंत हे काम करू शकतील.

**प्रशिक्षित उमेदवार :** निवड झालेल्या उमेदवारांना भूमी अभिलेख विभागामार्फत दोन आठवड्यांचे प्रशिक्षण दिले जाईल. ते पूर्ण केल्यानंतर परीक्षा घेतली जाईल आणि पात्र उमेदवारांना छत्रपती संभाजीनगर येथी लँड रेकॉर्ड ट्रेनिंग अकॅडमीकडून दोन वर्षांसाठी वैध असलेला परवाना दिला जाईल. केवळ जागेची मोजणी न झाल्यामुळे अनेक कामे थांबून राहतात. उद्योजक आणि नवीन व्यवसायासाठी सुरुवात देखील करता येत नाही. राज्याच्या प्रगतीसाठी बाधा होत असल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे. आता तातडीने मोजणी होईल, सर्वसामान्यांचा मनस्ताप वाचेल, वेळ वाचेल.

– चंद्रशेखर बावनकुळे, महसूलमंत्री, महाराष्ट्र

## भगवान महावीरांची महान जीवन गाथा

# भगवान महावीरांचे अवघे जीवनच आपणा सर्वांसाठी प्रेरणादायक

जैनांचे २४ वे तीर्थंकर भगवान महावीरांनी उभे आयुष्य संपूर्ण मानव जातीला सत्य आणि अहिंसेच्या मार्गावरून जाण्याचा मार्ग दाखविला. आपापसात एकजुटीने रहाण्यास शिकविले, पशुहत्येचा, जातीपातीच्या भेदभावाचा कडाडून विरोध केला. भगवान महावीरांनी मानवतेच्या कल्याणासाठी ऐहिक वैभवाचा:समस्त सुख-सोयींचा त्याग करून तप-त्यागाचा मार्ग अवलंबिला होता.

भगवान महावीरांचे अवघे जीवनच आपणा सर्वांसाठी प्रेरणादायक आहे. राजमहालात राहणाऱ्या महावीरांनी सगळ्या राजसुखाचा त्याग करून सत्याचा शोध घेतला आणि परम ज्ञानाची प्राप्ती करून घेतली त्याची जेवढी स्तुती गावी तितकी कमी आहे:या लेखातून भगवान महावीरांच्या जीवनाशी निगडीत महत्वपूर्ण गोष्टींवर प्रकाश टाकण्यात आलाय.

**महावीरांचा जन्म आणि प्रारंभिक जीवन –** ई.स. ५९९ पूर्वी वैशाली राज्यात, क्षत्रियकुंड नगरीत, इक्ष्वाकू वंशाचे राजा सिद्धार्थ आणि त्रिशला राणीच्या पोटी चैत्र महिन्यातील त्रयोदशीला भगवान महावीरांचा सामान्य बालकाच्या रुपात जन्म झाला. स्वामी महावीर हे बालवयापासून अत्यंत तेजस्वी आणि कुशाग्र बुद्धीचे बालक होते. कठीण तपोबलाच्या सहाय्याने त्यांनी आपल्या जीवनाला महान बनविले.

भगवान महावीरांना सन्मती, महावीर श्रमण, वर्धमान या नावांनी देखील ओळखलं जातं. त्यांच्या या वेगवेगळ्या नावांमागे देखील काही कथा जोडल्या गेल्या आहेत. असं म्हणतात कि त्यांच्या जन्मानंतर राज्यात खूप सुख-संपन्नता आणि वृद्धी झाली, त्यामुळे त्याचं नाव वर्धमान ठेवण्यात आलं.बालपणापासून त्यांच्यातील साहस, तेज, बल यामुळे त्यांना महावीर असं म्हंटल्या गेलं. आपल्या सगळ्या इच्छा आणि इंद्रियांवर त्यांनी विजय प्राप्त केल्यानं त्यांना ङ्गजितेंद्रङ्घ म्हंटल्या गेलं.

महावीर स्वामींचा विवाह – राजपुत्र म्हणून जन्माला आलेल्या महावीरांना संसारिक सुखाविषयी विशेष आसक्ती कधीच नव्हती, परंतु आई-वडिलांच्या इच्छेनुसार त्यांनी वसंतपूर येथील महासामंत समरवीरांची कन्या यशोदाशी विवाह केला. लग्नानंतर त्यांना प्रियदर्शनी नावाची एक कन्या देखील झाली.

भगवान महावीरांचे संन्यासी जीवन भगवान महावीरांना सुरुवातीपासून संसारिक सुखाची आसक्ती नव्हती, आई-वडिलांच्या मृत्युपश्चात त्यांना संन्यासी जीवनाची ओढ लागली होती परंतु भावाच्या विनंतीला मान देत ते काही दिवस थांबले.पुढे वयाच्या ३० व्या वर्षी महावीरांनी सर्व संसारीक मोह-मायेचा त्याग करून घर सोडण्याचा निर्णय घेतला आणि वैराग्य स्वीकारले.

घनदाट अरण्यात त्यांनी सलग १२ वर्ष कठोर तपश्चर्या केली आणि त्यांना ज्ञानाची प्राप्ती झाली. त्यानंतर त्यांची ख्याती चोहोदिशांना होऊ लागली. त्यांच्या महान उपदेशांमुळे आणि त्यांच्या ज्ञानाने प्रभावित होऊन मोठ-मोठे राजा-महाराजा त्यांचे



अनुयायी झाले. आपल्या उपदेशांच्या माध्यमातून त्यांनी लोकांना प्राणीमात्रांवर दया, आपापसातील बंधुभाव, सत्य-अहिंसेचा मार्ग स्वीकारण्यास प्रेरित केलं.

**भगवान महावीर आणि गौतम बुद्ध यांच्यातील विशेष –** भगवान महावीर आणि गौतम बुद्ध हे दोघेही सुख-संपन्न परिवारात राजघराण्यात जन्माला आले होते. अनेक प्रकारची सुखं पायाशी लोळण घेत असतांना देखील दोघानाही त्याचा कधी मोह झाला नाही उलट त्यांनी सत्याच्या शोधासाठी आपल्या ऐशो-आरामी जीवनाचा त्याग केला व घनदाट जंगलात कठोर तप केलं आणि लोकांना समान उपदेश केला.

याशिवाय भगवान महावीर आणि गौतमबुद्ध यांच्यातील आणखीन एक साम्य असे की दोघांची विचारधारा देखील अहिंसेवर आधारीत होती.

भगवान महावीरांची दर्शन स्यादवाद, अनेकांतवाद, त्रिरत्न, पंच महाव्रत ही तत्व असून गौतम बुद्धांची मुख्य तत्व अष्टांगिक मार्ग, प्रतीत्यसमुत्पाद, बुद्ध कथा, अनात्मवाद, आव्याकृत प्रश्नांवर बुद्धांचे मौन आणि निर्वाण आहे. बौद्ध आणि जैन धर्मात आपल्याला बऱ्याच समानता पाहायला मिळतात. दोन्ही धर्मात सत्य, अपरिग्रह, अस्तेय, सम्यक दर्शन, सम्यक ज्ञान, ब्रम्हचर्य, अहिंसा, सम्यक चरित्र, अनिश्वरवाद, तप आणि ध्यान विद्यमान आहेत. दोन्ही धर्म मानवाला सत्य आणि अहिंसेच्या मार्गावर चालण्याचा संदेश देतात. भगवान महावीर आणि गौतम बुद्धांमध्ये साल वृक्ष, तप, अहिंसा, आय समानता आढळतात. शिवाय दोघांची कर्मभूमी ही बिहार आहे.

भगवान महावीरांची शिकवण – जैनांचे २४ वे तीर्थंकर भगवान महावीरांनी आपल्या शिकवणुकीतून आणि उपदेशाच्या सहाय्याने लोकांना जीवन जगण्याची कला शिकवली आणि सत्य व अहिंसेचा मार्ग दाखवला.

भगवान महावीरांची शिकवणच जैन धर्माची मुख्य पंचशील सिद्धांत बनले. या सिद्धांतात सत्य, अपरिग्रह, अस्तेय, अहिंसा आणि ब्रम्हचर्य आहेत.पशुहत्या आणि हिंदू समाजात पसरलेल्या जाती व्यवस्थेचा विरोध करणारे भगवान महावीर यांच्या सिद्धांताना आणि शिकवणुकीला स्वीकारून कोणताही मनुष्य सच्चा जैन अनुयायी होऊ शकतो. जैन धर्माचे प्रमुख तीर्थंकर भगवान महावीरांची जयंती हिंदू धर्माच्या तिथीप्रमाणे चैत्र महिन्यातील शुक्लपक्षात त्रयोदशीला साजरी केली जाते. ई.स. ५९९ पूर्वी चैत्र महिन्याच्या १३ व्या दिवशी बिहार राज्यातील वैशाली इथं कुंडलपूर गावी भगवान महावीरांचा जन्म झाला होता. म्हणून त्यांच्या जन्मदिवसाला जैनधर्मीय लोक महावीर जयंती आणि जैन महापर्व म्हणून साजरा करतात. महावीर जयंतीच्या दिवशी जैन मंदिरांमध्ये अत्यंत आकर्षक पद्धतीने सजावट करण्यात येते, शिवाय जैन समुदाय या दिवशी भव्य शोभायात्रेचे आयोजन देखील करत असतं

महावीर जयंतीच्या पावन पर्वावर जैन धर्मीय लोक भगवान महावीरांनी दिलेल्या शिकवणुकीवर चालण्याचा प्रण करतात आणि त्यांच्या उपदेशाचे स्मरण करतात. भगवान महावीर जयंतीच्या दिवशी भारत सरकार तर्फ़े आधिकारिक सुट्टीची घोषणा करण्यात आलेली आहे. या दिवशी सगळ्या शाळा, कॉलेज, ऑफ़िस, कोर्ट, बँक, सहीत सगळी शासकीय कार्यालये बंद असतात.

**भगवान महावीरांचे मुख्य कार्य** –अहिंसेवर महावीरांचा सर्वोच्च अधिकार असल्याने त्यांच्याप्रती सगळ्यांना अपार आदर आहे. कोणत्याही परिस्थितीत त्यांनी अहिंसेचा मार्ग सोडलेला नाही, त्यांच्या या शिकवणुकीचा महात्मा गांधी आणि रवींद्रनाथ टागोर यांसारख्या महान व्यक्तींवर मोठा प्रभाव होता.

**भगवान महावीरांच्या काळात सभोवतालचे वातावरण अत्यंत अशांत होते:**

सर्वदूर ब्राम्हणांचे वर्चस्व असल्याने ते अन्य जातींच्या तुलनेत स्वत:ला सर्वश्रेष्ठ समजत असत, आपल्या धार्मिक होम-यज्ञात टे प्राण्यांचा बळी देत असत. त्यांच्या या कृत्यांचा क्षत्रिय देखील विरोध करत असत. **स्त्रोत – इंटरनेट**

# सिडको येथे महावीर जन्मकल्याणक निमित्त नवकार जाप, आरोग्य शिबिर व रक्तदान शिबिर उत्साहात संपन्न

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**


भगवान महावीर जन्मकल्याणक निमित्त सिडको रॉयल परिवार व सिडको रॉयल युथ श्री जैन श्रावक संघ यांच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये सुरुवातीस प.पु.ग.अभयदेव सुरिश्वरजी महाराजा यांच्या प्रेरनेने नवकार फाउंडेशन जीतो वब सकल जैन समाज छ.संभाजीनगर तर्फे विश्वशांति हेतु संकल्प केलेल्या १००८ करोड़ नवकार महामंत्र यज्ञ सहभागीता हेतु सामूहिक नवकार महामंत्र चा जाप करण्यात आला तसेच आरोग्य तपासणी शिबिर, रक्तदान शिबिर वब बालकांसाठी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास मा.मंत्री अतुल सावे, मारवाड़ी महासभेचे अध्यक्ष डॉक्टर पुरुषोत्तम दरख, सकल जैन समाजाचे अध्यक्ष राजेंद्रबाबु दर्डा, कार्याध्यक्षब मा.आ. सुभाष झांबड,घेवरचंद बोथरा,विलास साहूजी, उपाध्यक्ष डॉक्टर प्रकाश झांबड,संजय संचेती, रवि मुगदिया,अनिलमामा संचेती, पवनकुमार कच्छोट चिप इंजीनियर महावितरण,भ.महावीर जन्मकल्याणक समिति अध्यक्ष प्रतिक साहूजी,कार्याध्यक्षब अजय सिंघवी श्रेणीक कासलीवाल बाहुबली वायकोस हितेश काकरीया , मनीषा भंसाली दिगबर क्षीरसागर यांची प्रमुख उपस्थिति होती.

आरोग्य तपासणी शिबिरासाठी डॉ. दीपक महासलेकर, डॉ. गोविंदा नागटकर, डॉ. शामली भारुका (बाफना), डॉ. प्रकाश झांबड, डॉ. प्रियंका झांबड, डॉ. प्रकाश पाटणी, डॉ. दीपक यादव, डॉ. संकेत राठोड आणि डॉ. तेजस चोपडा यांनी वैद्यकीय सेवा दिली.

कार्यक्रमाचे संचालन आरती झांबड व रश्मी झांबड यांनी केले. स्वागतगीत संगीता रुणवाल व सुनिता छल्लाणी यांनी सादर केले. महावीर जन्मकल्याणकाच्या निमित्ताने बालकांनी भगवान महावीर यांच्यावर आधारित सुंदर चित्रे काढली होती. या स्पर्धेतील सहभागी विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. रक्तदान शिबिराचे आयोजन सिडको युथ परिवाराच्या वतीने करण्यात आले होते. या उपक्रमाचे प्रमुख अंकीत झांबड होते, तर प्रकल्प प्रमुख म्हणून डॉ. प्रकाश झांबड व डॉ. प्रकाश पाटणी यांनी जबाबदारी सांभाळली. या शिबिरात एकूण ३२ जणांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. कार्यक्रमास विविध लाभार्थी परिवारानी लाभ घेतला केसरबाग़ अनिल साहूजी सभा मंडप मनोज मामा बोरा, राजेश कांकरिया, मुगदिया परिवार नम्रता ग्रुप, हवेली वाला परिवार, पंकज फुलफगर, पारस बोथरा, विजयजी कटारिया, श्री प्रविणजी कटारीया, राजेशजी संचेती (लोणारवाला), प्रफुलजी बाफना, सुरेशजी झांबड, तनसुखजी - महेन्द्रजी झाबंड, संदीपजी छल्लाणी, दिपकजी संचेती, अजितजी मुथियान, अजयजी सिंघवी, उमेदम लजी कोठारी, चांदमलजी विनयजी सुराणा, मनिषजी पारख, कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सिडको रॉयल परिवार व सिडको रॉयल युथ श्री जैन श्रावक संघ यांनी विशेष परिश्रम घेतले.

आभार प्रदर्शन राजीव संचेती व रवी मुगदिया यांनी केले. भ.महावीर जन्मकल्याणक निमित्त ३१ मार्च रोजी सकाळी भगवंताचा अभिशेक पूजा आरती तय नंतर सकाळी ६.३०वा. सिड्को रोयल ग्रुप तर्फे भव्य दु चाकी - चार चाकी वाहन रेली सकाळी ७.००वा. महावीर स्तंभ येथे धर्म ध्वजा रोहन. सकाळी ८.३० वा रथ यात्रेच्या प्रारंभी श्री.शंखेश्वर पार्श्वनाथ मंदिराचा रथ ढोल पथक बैंड पथक सहभागी होणार आहे. वाहन रेलित माझे शहर माझी जबाबदारी या स्लोगन अंतर्गत जास्तीत जास्त इव्ही गाड्या सहभागी करण्यात येणार आहे. रथ यात्रा मार्गावर रत्तीलाल प्रवीनकुमार मुगदिया परिवार नम्रता ग्रुप तर्फे प्रभावना वाटप करण्यात येणार आहे.

# जिगीशा इंटरनॅशनल स्कूलचा विद्यार्थी विवेक प्रवीण बुरुडे याचे ९३% गुणांसह यश



मुलांकडून अभ्यास करून घेण्याची जबाबदारी आई उचलत असल्याने मुलांचे भविष्य उज्ज्वल असते. वडिलांच्या कामाचा व्याप असल्याने लक्ष देणे होत नाही हे समजून महिलांचे मुलांकडे जास्त लक्ष असते. त्याचा परिणाम निकालावर होतो हे मात्र नक्की.

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

छत्रपती संभाजीनगर येथील सिडको परिसरातील जिगीशा इंटरनॅशनल स्कूल या शाळेचा विद्यार्थी विवेक प्रवीण बुरुडे याने वार्षिक परीक्षेत ९३ टक्के गुण मि ळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्याच्या या यशामुळे शाळा परिसरात तसेच कुटुंबीयांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

लहान वयातच अभ्यासू वृत्ती, नियमित सराव आणि शिस्तबद्ध अभ्यास पद्धतीमुळे विवेकने हे यश मिळवले. वर्ग दुसरीचा विद्यार्थी असतानाही त्याने सातत्यपूर्ण मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे प्रोत्साहन यांच्या जोरावर उत्कृष्ट कामगिरी केली.

विवेकच्या या यशामागे त्याचे वडील व आई यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच शाळेतील नाथ मॅडम, वर्गशिक्षिका सरिता मॅडम, माधवी मॅडम आणि आदिती कुलकर्णी मॅडम यांनी विशेष परिश्रम घेत विद्यार्थ्याला योग्य दिशा दिली. शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे विवेकचा आत्मविश्वास वाढून त्याने परीक्षेत उत्तम यश मिळवले. शाळेच्या मुख्याध्यापकांनी व शिक्षकवर्गाने विवेकचे अभिनंदन करत त्याच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. भविष्यातही असेच यश मिळवत शाळेचे व पालकांचे नाव उज्ज्वल करावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

# सागर सोनवणे यांना राज्यस्तरीय ‘यंग ॲग्री-इन्स्पिरेटर अवॉर्ड २०२५’



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

सागर सोनवणे (B.Sc. Agri), ताडपिंपळगाव येथील शेती क्षेत्रातील याच्या कामाची दखल घेऊन तिफण फाउंडेशन तर्फे सागर सोनवणे यांना राज्यस्तरीय ‘यंग ॲग्री-इन्स्पिरेटर अवॉर्ड २०२५’ जाहीर झाला आहे. ग्रामीण तरुण शेतीकडे वळावेत, यासाठी सागर ‘सक्सेस ॲग्रो’च्या माध्यमातून प्रयत्न करत आहे.

# जयघोषात ५१ फूट सिध्द प्रतिमेची स्थापना !

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

कचनेरजवळ श्रीक्षेत्र धर्मतीर्थ येथे श्री वृषभ सिध्द जिन बिम्बाच्या ५१ फूट अतिविशाल सिध्द प्रतिमा पंचकल्याणक प्रतिष्ठापना, महामस्तकाभिषेक महोत्सवात काल रविवारी भाविकांची गर्दी उसळली. सिध्द भगवंताच्या या भव्य मूर्तीची स्थापना परम पूज्य जगद्गुरु गणाधिपती, गणधराचार्य श्री कुंथुसागरजी गुरुदेव यांच्या पवित्र सान्निध्यात व क्रांतिकारी राष्ट्रसंत दिगंबर जैनाचार्य श्री गुप्तीनंदीजी गुरुदेव यांच्या पवित्र उपस्थितीत त्यांच्याच प्रेरणेने व मार्गदर्शनाखाली झाली. यावेळी भाविकांनी टाळ्यांचा कडकडाट आणि जयजयकार केला. अत्यंत नेत्रदीपक व जीवनात पुन्हा कधी असा दुर्मिळ प्रसंग पहायला, करायला मिळेल सांगता येणार नाही असे प्रतिपादन संजय पापडीवाल यांनी केले.

या भव्य मूर्तीच्या तळाला गणाधिपती गणधराचार्य श्री कुंथुसागर जी गुरुदेव, आचार्य गुप्तिनंदीजी गुरुदेव, आचार्य सुयशगुप्तजी, आचार्य श्रुतधरनंदीजी सहीत साधु संतांनी यंत्र, नवरत्न, सोने चांदी,पारा विधीपूर्वक ठेवण्यात आला.या वेळी संजय पापडीवाल, चंद्रशेखर पाटणी,पवन पापडीवाल राजेंद्र पाटणी सपत्नीक उपस्थित होते. प्रतिष्ठाचार्य मधुर पंडीत यांनी पौरोहित्य केले.

या भव्य मूर्तीच्या अग्रस्थानी सोने, चांदी, नवरत्ने, यंत्रे अर्पण करण्यात आली आहेत. डॉ.अंजली पापडीवाल यांनी आपल्या बोटातील सोन्याची हिरे जडीत अंगठी काढून अतिशय भक्तीभावाने मूर्तीच्या खाली समर्पित केली.

यावेळी सर्व भाविकांचे स्वागत पंचकल्याणक प्रतिष्ठापना महोत्सव समितीचे अध्यक्ष श्री संजय पन्नालालजी पापडीवाल व कार्याध्यक्ष श्री चंद्रशेखर चांदमलजी पाटणी यांनी केले. महामंत्री पवनकुमार पापडीवाल, जालनापुरकर यांच्यासह स्वागताध्यक्ष जिनेंद्र बाकलीवाल, प्रमोद जैन, कोषाध्यक्ष राजेंद्र पाटणी, मार्गदर्शक गुलाबचंद कासलीवाल, सुनील काला, आर. आर. पहाडे आदी मान्यवर उपस्थित होते. तीन क्रेन्सच्या सहाय्याने अनेक तासांच्या अथक परिश्रमाने संजय कासलीवाल व मनोज कासलीवाल यांचे मार्गदर्शनामध्ये हे आव्हान पेलण्यात आले.

या महोत्सवात आचार्य श्री तीर्थनंदीजी, प्रज्ञाश्रमण गणनायक आचार्य श्री सुयशगुप्तजी, आचार्य श्री श्रुतधरनंदीजी, गणिनी आर्यिका क्षमाश्री माताजी यांची विशेष ससंघ उपस्थिती लाभली आहे. काल रविवारी महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी गर्भकल्याणक उत्तरार्धाला पहाटे ५.३० वाजता प्रारंभ झाला. पंचकल्याणक विधान व ८१ पवित्र कलशांमधील जलाने धर्मतीर्थ अभिषेक करण्यात आला. वास्तुविधान, हवन, मंदिरात गर्भशोधन विधी झाला. संध्याकाळी गणाधराचार्यांचे मंगल प्रवचन झाले. त्यानंतर आरती व



रात्री सांस्कृतिक कार्यक्रम व गर्भकल्याणक विधी संस्कार करण्यात आले. यावेळी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. राज्यभरातून तसेच देशभरातील दिगंबर जैन भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. अशी माहिती नरेंद्र अजमेरा पियुष कासलीवाल यानी दिली

## इंदोरच्या गोधा परिवाराचे योगदान

इंदोर येथील रहिवासी श्रीमती प्रेमलता गोधा, श्री अनिल कुमार व सौ.ज्योती गोधा, श्री अरुणकुमार व सौ.अंजु गोधा आणि परिवाराने ५१ फूट उंचीची अतिविशाल सिद्ध प्रतिमा प्रदान केली. पुण्याचे श्री जिनेन्द्र, सौ. हीरामणी, श्री राजेश, सौ. रेखा, श्री धीरज, सौ. सोनिया, श्री विकास, सौ. सपना व बाकलीवाल परिवार संपूर्ण आहारदाता आहे. बाराबंकीचे श्री प्रमोद जैन परिवार महायज्ञनायक तर गुरुग्रामचे श्री विजेंदर, सौ.निर्मल व जैन परिवार यज्ञनायक आहे. पापलकर परिवाराच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. आचार्य श्री श्रुतधरनंदीजी यांचा दिक्षा दिवस महोत्सव साजरा करण्यात आला.

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय छत्रपती संभाजीनगर येथील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांवर अन्याय; प्रशासनाचे दुर्लक्ष

## कामगार नेते राजेंद्र पोहाल आक्रमक; मागण्यांसाठी लढा सुरूच

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांवर सुरू असलेल्या कथित अन्याय आणि अत्याचाराविरोधात प्रहार जनशक्ती पक्ष कर्मचारी संघटना आक्रमक झाली आहे. संघटनेचे नेते राजेंद्र पोहाल यांच्या नेतृत्वाखाली प्रशासनाविरोधात जोरदार लढा उभारण्यात येत असून, वारंवार निवेदने व आंदोलने करूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

कामगारांच्या प्रश्नांकडे प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करत पोहाल यांनी इशारा दिला की, आता संयमाचा बांध फुटला असून, न्याय न मिळाल्यास आंदोलन अधिक तीव्र करून रस्त्यावर उतरू. या भूमिकेमुळे कामगारांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, रुग्णालयातील स्वच्छता व रुग्णसेवा ही पूर्णपणे चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांवर अवलंबून असताना त्यांच्याच मूलभूत हक्कांकडे दुर्लक्ष केले जात आहे. जे कामगार दिवस-रात्र



रुग्णसेवेत झटतात, त्यांनाच अन्यायाचा साम ना करावा लागतो, ही दुर्दैवी बाब आहे,ङ्ग अशी तीव्र प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली.

याचवेळी काही कंत्राटदारांकडून राजकीय आश्रयाच्या जोरावर बोगस कामे सुरू असल्याचा गंभीर आरोपही संघटनेने केला आहे. कामगारांवर अन्याय आणि कंत्राटदारांवर माया ही प्रशासनाची दुटप्पी भूमिका आम्ही सहन करणार नाही, असा इशारा देण्यात आला.

दरम्यान, प्रशासनाने लवकरात लवकर सकारात्मक निर्णय न घेतल्यास आंदोलन आणखी तीव्र करून मोठा संघर्ष उभारला जाईल, असा इशारा प्रहार जनशक्ती पक्ष कर्मचारी संघटनेने दिला आहे. येणाऱ्या काळात उग्र आंदोलन छेडले जाईल आणि याची पूर्ण जबाबदारी प्रशासनावर राहील.

### संघटनेच्या प्रमुख मागण्या

- सरळ सेवा भरतीतील ३५७ नव्या कर्मचाऱ्यांनी जुन्या कर्मचाऱ्यांप्रमाणे सर्व कामे करावीत
- लाड पागे समितीची रखडलेली कामे तातडीने पूर्ण करावीत
- सेवा जेष्ठतेनुसार पदोन्नती देण्यात यावी
- कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांशी संबंधित प्रलंबित कामे त्वरित मार्गी लावावीत
- ड्रेनेज लाईन व इतर मूलभूत सुविधा तात्काळ पूर्ण कराव्यात
- महाराष्ट्र सुरक्षा बलातील एसएसओ सुरेश भाले यांची तात्काळ बदली करावी

# नगररचना विभागातील प्रलंबित परवानगी संचिका आयुक्तांच्या पुढाकाराने निकाली

## महापालिकेच्या उत्पन्नवाढीस होणार मोठा हातभार



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे आयुक्त श्रीकांत यांनी आज नगररचना विभागात संध्याकाळी उशिरापर्यंत थांबून परवानगीच्या सर्व प्रलंबित संचिका निकाली काढण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला. त्यांच्या या तत्पर आणि प्रभावी कृतीमुळे महापालिकेच्या उत्पन्नात निश्चितच मोठी वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

मार्च महिना हा महसूल वसुलीचा महत्त्वाचा कालावधी असताना, यावर्षी विविध सण व सुट्ट्यांमुळे कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता होती. मात्र, आयुक्तांनी याची दखल घेत महापालिकेची उत्पन्नवाढ व वसुलीवर कोणताही परिणाम होऊ नये यासाठी सुट्टीच्या दिवशीही सर्व कार्यालये सुरू ठेवण्याचे परिपत्रक जारी केले आहे.

विशेष म्हणजे, आयुक्तांनी स्वतः या परिपत्रकाची प्रभावी अंमलबजावणी करत आज नगररचना विभागात उशिरापर्यंत उपस्थित राहून सर्व प्रलंबित परवानगी संचिका मार्च अखेरपूर्वी निकाली काढण्याचे काम पूर्ण केले.

त्यांच्या कार्यतत्परतेचे, जिद्दीचे आणि व्यावसायिक दृष्टिकोनाचे हे उत्तम उदाहरण मानले जात आहे. यावेळी उपसंचालक (नगररचना) मनोज गरजे, उपनगर रचनाकार कौस्तुभ भावे तसेच नगररचना विभागातील इतर अधिकारी उपस्थित होते.

# सेवा सुधारणांचा १५० दिवसांचा कार्यक्रम; 'सेवाकर्मी प्लस'मध्ये जि.प. छत्रपती संभाजीनगर राज्यात अव्वल

## मुख्य कार्यकारी अधिकारी अंकीत मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सन्मानीत

छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)

राज्य शासनाच्या प्रशासनाला आधुनिक बनवतांनाच प्रशासनाला गति देण्यासाठी सेवाविषयक सुधारणांचा कार्यक्रम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला होता. १५० दिवसांच्या या सुधारणा कार्यक्रमात 'सेवा कर्मी प्लस' या कार्यक्रमात जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे. त्याबद्दल आज मुंबई येथे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अंकीत यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सन्मानीत करण्यात आले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून सेवाविषयक प्रगतीचे मुल्यांकन करणे व सेवाविषयक बाबींच्या सुधारणांकरीता १५० दिवसांचा कार्यक्रम दि.६ मे ते दि.२ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत राबविण्यात आला. तथापि,राज्यातील पुरपरिस्थितीमुळे या कार्यक्रमास दि.१० जानेवारी२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

**काय होते या कार्यक्रमात?**

या कार्यक्रमात प्रशासकीय सुधारणांम ध्ये मनुष्यबळ विषयक बाबींवर लक्ष केंद्रीत करण्यात आले होते. त्यात कर्मचाऱ्यांच्या सेवाज्येष्ठता याद्या प्रसिध्द करणे, पदोन्नती करणे, बिंदुनामावली नोंदवही अद्ययावत करणे, अनुकंपा भरती, सरळसेवा भरती, केंद्र शासनाच्या ळऋजढ पोर्टलवर नोंदणी तसेच ५ प्रशिक्षण कोर्स पूर्ण करणे व सेवापुस्तिका अद्ययावत करणे या बाबींचा समावेश होता. जि.प. छत्रपती संभाजीनगरची सर्वोत्कृष्ट कामगिरी या कार्यक्रमांतर्गत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित यांच्या मार्गदर्शनाखाली उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) राघवेंद्र घोरपडे यांनी यशस्वी अंमलबजावणी केली. यामध्ये जिल्हा परिषद अंतर्गतच्या सर्व खाते प्रमुखांनी व त्यांच्या अधिनिस्त सर्व कर्मचाऱ्यांनी सहयोग दिला. त्यामुळे जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगरच्या कामकाजाचे शासनस्तरावरुन गुणांकन होऊन राज्यातील सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या जिल्हा परिषदमध्ये जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगरचा समावेश झाला. या अभियानांतर्गत उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल आज मुंबई येथे सह्याद्री अतिथी गृहात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र प्रदान करुन सन्मानीत करण्यात आले.

# कमलनयन बजाज हॉस्पिटलला राष्ट्रीय स्तरावर दुहेरी मानाचा बहुमान

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

एमएमआरआय ट्रस्ट अंतर्गत कार्यरत असलेल्या कमलनयन बजाज हॉस्पिटलने राष्ट्रीय स्तरावर मोठी कामगिरी करत टाइम्स फ्युचर ऑफ मॅटर्निटी अवॉर्ड्स २०२६ मध्ये प्रथम क्रमांकाचे दुहेरी मानांकन पटकावले आहे. हॉस्पिटलला खालील दोन प्रतिष्ठित पुरस्कारांनी गौरविण्यात आले. बेस्ट हाय-रिस्क प्रेग्नन्सी अँड मॅटर्नल क्रिटिकल केअर सेंटर ऑफ द इयर

बेस्ट कॉम्प्रिहेन्सिव्ह मॅटर्निटी हॉस्पिटल- हे पुरस्कार नवी दिल्ली येथील शांग्री-ला इरोस येथे आयोजित भव्य समारंभात प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमात देशभरातील नामांकित तज्ञ, धोरणकर्ते आणि आरोग्य क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. हा मानाचा पुरस्कार डॉ. जॉर्ज नोएल फर्नांडिस (उएज) आणि डॉ. अजय वसंत रोटे (मेडिकल डायरेक्टर) यांनी स्वीकारला.




मातृत्व सेवेत उत्कृष्टतेचा नवा मापदंड- कमलनयन बजाज हॉस्पिटलने विशेषतः खालील क्षेत्रांमध्ये आपली ठळक ओळख निर्माण केली आहे. उच्च जोखमीच्या गर्भधारणेचे प्रभावी व्यवस्थापन, प्रगत म ातृत्व क्रिटिकल केअर सुविधा, प्रसूतीपूर्व, प्रसूतीदरम्यान व प्रसूतीनंतरची एकात्मिक सेवा, तज्ञ डॉक्टर व मल्टिडिसिप्लिनरी टीम द्वारे रुग्णकेंद्री उपचार.

हॉस्पिटलची सेवा पद्धती "Patients F$irst" या तत्वावर आधारित असून, सुरक्षित मातृत्व आणि उत्कृष्ट परिणाम हेच मुख्य ध्येय आहे.

नेतृत्वाचे मत - डॉ. जॉर्ज नोएल फर्नांडिस, CEO, म्हणाले:

'हा सन्मान आमच्या संपूर्ण टीमच्या समर्पणाचा आणि उत्कृष्टतेच्या ध्यासाचा पुरावा आहे. प्रत्येक आई आणि बाळासाठी सुरक्षित आणि दर्जेदार सेवा देण्याची आमची वचनबद्धता अधिक दृढ झाली आहे.'

डॉ. अजय वसंत रोटे, मेडिकल डायरेक्टर, म्हणाले:

'हाय-रिस्क प्रेग्नन्सीचे व्यवस्थापन हे केवळ कौशल्य नाही तर एक सिस्टीमॅटिक आणि गुणवत्ता-आधारित दृष्टिकोन आहे. हा पुरस्कार आमच्या गुणवत्तापूर्ण आणि संवेदनशील सेवेला मिळालेली राष्ट्रीय पातळीवरील दाद आहे.'

कार्यक्रमाविषयी - टाइम्स फ्युचर ऑफ मॅटर्निटी समिट अँड अवॉर्ड्स २०२६ हा कार्यक्रम मातृत्व सेवेत नवकल्पना, गुणवत्ता आणि सर्वसमावेशकतेवर आधारित राष्ट्रीय स्तरावरील महत्त्वपूर्ण मंच ठरला.

कमलनयन बजाज हॉस्पिटल विषयी- कमलनयन बजाज हॉस्पिटल हे एक अग्रगण्य मल्टिस्पेशालिटी रुग्णालय असून, उत्कृष्ट वैद्यकीय सेवा, शिक्षण आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य व्यवस्थापनासाठी ओळखले जाते.

# योग्य जागरूकतेमुळे विशेष मुलांचे जीवन अधिक सक्षम करता येते - डॉ. अनुपम टाकळकर

छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)

जागतिक डाऊन सिंड्रोम दिनाचे औचित्य साधत इंडियन मेडिकल असोसिएशन तर्फे नवजीवन सोसायटी संचलित विशेष विद्यालयात अत्यंत संवेदनशील आणि समाजाभिमुख आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले. विशेष गरजा असलेल्या मुलांच्या आरोग्याकडे लक्ष देणे आणि त्यांना योग्य वैद्यकीय मार्गदर्शन मिळावे हा या उपक्रमामागील मुख्य हेतू होता.

N a v j i v a n School for Physical Challenged Children येथे हे शिबीर पार पडले. या उपक्रमात शाळेतील शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांनी मुलांची माहिती देत डॉक्टरांना सहकार्य केले.




या शिबिरात ऑटिझम आणि डाऊन सिंड्रोम असलेल्या मुलांची सखोल तपासणी करण्यात आली. त्वचारोग, बालरोग आणि सर्वसाधारण आरोग्य इत्यादी तपासण्या आणि उपचार करण्यात आले.

मुलांच्या आरोग्यविषयक सम स्यांबाबत शिक्षकांना सविस्तर मार्गदर्शन देण्यात आले. या शिबिरात डॉ. अनुपम टाकळकर, डॉ. दत्ता कदम, डॉ. विनोद तोतला, डॉ. प्रदीप कुलकर्णी , डॉ. सुधीर रांजवण),डॉ. अनिल पाटील आणि डॉ. सचिन देशमुख यांनी सहभाग घेतला.

अध्यक्ष डॉ. अनुपम टाकळकर यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, ङ्गविशेष मुलांची काळजी घेणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. या मुलांना नियमित तपासणी, योग्य उपचार आणि सातत्यपूर्ण लक्ष मिळणे अत्यंत गरजेचे आहे. शाळांमधून अशा उपक्रमांचे आयोजन केल्यास अधिकाधिक मुलांपर्यंत आरोग्यसेवा पोहोचू शकते. शिक्षकांची भूमिका येथे अत्यंत महत्त्वाची आहे. तेच मुलांच्या दैनंदिन सवयी ओळखतात आणि योग्य वेळी मार्गदर्शन मिळवून देऊ शकतात. समाजात या विषयाबद्दल जागरूकता वाढवणे आवश्यक आहे. इंडियन मेडिकल असोसिएशनच्या माध्यमातून आम्ही अशा उपक्रमांद्वारे प्रत्येक स्तरावर काम करत राहू.

कार्यक्रमादरम्यान शाळेतील ऑटिझम असलेल्या मुलांनी योगाचे सादरीकरण केले. या सादरीकरणाने उपस्थित सर्वांची मने भारावून गेली . मुलांनी अत्यंत एकाग्रतेने आणि आत्मविश्वासाने योगासनांचे प्रदर्शन केले. त्यांच्या या प्रयत्नांचे आय एम ए च्या सर्व उपस्थित सदस्यांनी मनापासून कौतुक केले.

प्रकल्प प्रमुख व माजी अध्यक्ष डॉ. दत्ता कदम यांनी सांगितले की, ङ्गआयएमए कनेक्ट उपक्रमातून सम ाजाशी जोडलेले राहणे हा आमचा उद्देश आहे. विशेष मुलांसाठी घेतलेले हे शिबिर त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरते.

बालरोगतज्ज्ञ संघटनेचे सचिव डॉ. विनोद तोतला यांनी मुलांच्या सवयींबाबत मार्गदर्शन करताना सांगितले की, ङ्गमुलांच्या दैनंदिन जीवनात स्वच्छता, नियमित आहार आणि योग्य सवयी यांचा समावेश असणे अत्यंत आवश्यक आहे. शिक्षकांनी या सवयी रुजवण्यात महत्वाची भूमिका बजावावी.

या शिबिराद्वारे अनेक मुलांची तपासणी करण्यात आली. शिक्षकांना आवश्यक ते वैद्यकीय मार्गदर्शन देण्यात आले. या उपक्रमामुळे विशेष मुलांच्या आरोग्याबाबत एक सकारात्मक आणि जागरूक वातावरण निर्माण झाले. सम ाजातील प्रत्येक घटकापर्यंत आरोग्यसेवा पोहोचवण्याच्या दिशेने हा उपक्रम एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरला.

या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी आय एम ए सोबत नवजीवन शाळेच्या डॉ शर्मिला गांधी यांनी महत्वाची भूमिका मांडली.

## सामान्य...

असून ताणतणाव
करत नाहीत मान्य
देत राही भरवसा
स्थिती ही सामान्य

घोटाळी पांढरे ढग
म्हणे पडेल पर्जन्य
भिऊनको पाठीशी
दावे प्रेमळसौजन्य

होई सारे ऑलवेल
पासबुकबाकीशून्य
सहायतेचे प्रतिक्षेत
दुबळेअसहाय दैन्य

भूक उद्याही असेलं
राखून ठेवावे धान्य
तिजोरी भलीखाली
बचती द्यावे प्राधान्य

रिकामे असता हात
महान दाता वदान्य
लढा स्थिती विरूद्ध
मनात उसळे चैतन्य

जगभर अ स्वस्थता
सर्व हो छिन्नविछिन्न
कशी राहणार सांगा
आपली स्थितीभिन्न

एकजुटीच्यालढाईत
मनांत नको मालिन्य
युध्दा विजय दाखवू
पवित्र संबंधअन्योन्य

- हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६




हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबंधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com. RNI.No. MAHMAR/2007/21199